# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


दिनांक : ०४/०६/२०२५

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय : श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर व मंदिराशेजारील प्रतिक्षालय इमारत येथे जमा होणारे लोखंड, अल्युमिनीयम, स्टील, पितळ, तांबा, प्लास्टीक, रद्दी पेपर, कालबाहय पुस्तके, पुठ्ठे, गायीच्या तूपाचे पत्र्याचे डब्बे व प्लास्टीक गोणी इ. वस्तू भंगारात विकत घेण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर व मंदिराशेजारील प्रतिक्षालय इमारत येथे जमा होणारे लोखंड, अल्युमिनीयम, स्टील, पितळ, तांबा, प्लास्टीक, रद्दी पेपर, पुस्तके, पुठ्ठे, गायीच्या तूपाचे पत्र्याचे डब्बे व प्लास्टीक गोणी इ. टाकाऊ व निरूपयोगी वस्तू भंगारात विकत घेण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती –**

१. सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रके दोन लिफाफ्यात सादर करावीत. एका लिफाफ्यात (Technical Bid) यामध्ये कंपनीची माहिती, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/उद्यम प्रमाणपत्र /गुमास्ता प्रमाणपत्र मोबाईल क्रमांक, कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र,जीएसटी प्रमाणपत्राची प्रत, वार्षिक उलाढाल, पॅन कार्डची प्रत इ खालील नमूद केल्याप्रमाणे, दुसऱ्या लिफाफ्यात (Financial Bid) मूल्य दरपत्रक याप्रमाणे दोन वेगवेगळया लखोटयामध्ये भरुन लाखेने सिलबंद करुन सदर लिफाफे दि. १२/०६/२०२५ रोजी दुपारी ०४.३० वाजेपर्यंत मंदिर प्रतिक्षालय इमारत तळमजला येथील आवक–जावक नोंदणी विभागामध्ये सादर करावी.

२. सदरील कामाचा कालावधी हा २ वर्षाचा राहील.

३. दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २०–२५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन आपातकालीन परिस्थितीत त्वरीत उपस्थित राहणे शक्य होईल.

४. मागील ३ वर्षाची आर्थिक उलाढाल कमीत कमी ५ लक्ष असावी. याबाबत सीए प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफ्यात सादर करावी.

५. दरपत्रक भरताना सर्व प्रकारचे कर मिळून एकत्रित रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकातच दर भरुन देणे आवश्यक आहे. न्यास दरपत्रकात दर भरुन न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

६. न्यासाने नेमून दिलेली कामे विहित वेळेत न केल्यास वा काम न्यासाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार न आढळल्यास, कामात दिरंगाई होत असेल, अथवा कामात असमाधानकारक परिस्थिती आढळून आल्यास किंवा कोणताही वाद निर्माण झाल्यास दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार न्यासास असेल.

७. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

८. दरपत्रकधारकाने GST क्रमांक व PAN कार्ड दरपत्रकांत नमूद करावा. (सोबत प्रत जोडावी.

९. दरपत्रकधारकाने GST क्रमांक लागू नसल्यास, कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून न्यास दरपत्रकासोबत सादर करावे.

१०.माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११ वर न्यासाचे देखभाल व दुरुस्ती विभागामधील विभाग प्रमुखयांच्याशी संपर्क साधावा.

११.अनामत रक्कम रु. २०,०००/– चा डिमांड ड्राफ्ट (DD) अंदाजपत्रासोबत जमा करण्यात यावा.

१२.पात्र निविदाधारकाने मध्येच काम सोडले तर त्याचे डिपॉझिट (अनामत रक्कम) जप्त करण्यात येईल.

१३.दि. १३/०६/२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

Vpatil

( कार्यकारी अधिकारी )

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


## दरपत्रकाचा तपशील

विषय : श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर व मंदिराशेजारील प्रतिक्षालय इमारत येथे जमा होणारे लोखंड, अल्युमिनीयम, स्टील, पितळ, तांबा, प्लास्टीक, रद्दी पेपर, कालबाहय पुस्तके, पुठ्ठे, गायीच्या तूपाचे पत्र्याचे डब्बे व प्लास्टीक गोणी इ. वस्तू भंगारात विकत घेण्याकरीता सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

नाव:------------------------------------------------------------

पत्ता: ----------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

मोबाईल क्र. : ---------------------- नोंदणी क्रमांक:--------------------------

जीएसटी क्रमांक : ----------------------- पॅन कार्ड क्रमांक :-------------------

| अ.क्र. | तपशील | दर प्रति किलो |
|---|---|---|
| १ | लोखंड भंगार | |
| २ | प्लास्टीक | |
| ३ | अल्युमिनीयम | |
| ४ | पीतळ | |
| ५ | स्टील | |
| ६ | तांबा | |
| ७ | लकडा प्लाय लमसम | |
| ८ | वायर कॉपर | |
| ९ | कागद वाईट | |
| १० | कागद पीला,लाल | |
| ११ | वायर | |
| १२ | न्यूज पेपर | |
| १३ | पतरा भंगार | |
| १४ | पुस्तके कालबाहय | |
| १५ | पुठ्ठा | |
| १६ | तूपाचे रिकामे डब्बे | |
| १७ | प्लास्टीक गोणी | |
| १८ | **इलेक्ट्रीक वस्तू** –एलसीडी<br>एसी<br>एलईडी<br>फ्रीज<br>वॉटरकुलर | |